**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६२ सन २०२२</u>**

**<u>निशाणी २७ खालील आदेश</u>**

०१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

०२. प्रतिवादी क्र.१ व ४ ते ११ व १४,१५ यांना त्यांची कैफियत व वादीच्या तुर्तातुर्त ताकीद अर्जावर त्यांचे म्हणणे अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ व ४ ते ११ व १४,१५ यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, त्यांचे विरुध्द कैफीयत नाहीचा आदेश झालेला आहे. परंतू त्यांना वेळेत योग्य ती माहीती व कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे ते कैफीयत व म्हणणे दाखल करु शकलेले नाहीत. प्रतिवादी यांचा यामागील न्यायालयाचा अपमान व अवमान करण्याचा हेतू नव्हता. नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीकोनातून प्रतिवादी यांची कैफीयत न्यालयालयासमोर योग्य न्यायनिवाडा होणेकरीता अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास प्रतिवादी यांचे न्यायी हक्कावर गदा येणारी आहे. सबब न्यायापूर्ततेकरीता त्यांना कैफीयत व वादीचे ताकीद अर्जावर म्हणणे दाखल करणेस परवानगी देणेत यावी ही विनंती केली आहे.

०४. प्रतिवादींनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केलेला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सदर अर्ज मंजूर व्हावा या निष्कर्शापर न्यायालय आल्यास योग्य तो खर्च आकारणेची विनंती केलेली आहे .

०५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ व ४ ते ११ व १४,१५ यांना दावा समन्सची बजावणी होवून ते दि.२७/०४/२०२२ रोजी हजर झाले परंतू , दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ अन्वये प्रतिवादी यांस उचित संधी देवून देखील त्यांनी विहीत मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही.

प्रतिवादी यांना वेळेत माहीत व कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे कैफीयत व म्हणणे देता आलेले नाही असे कारण प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केले आहे. त्यांनी नमूद केलेल्या कारणाच्या पुष्ठयर्थ कोणताही पुरावा दिलेला नाही. तरीही नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.१ व ४ ते ११ व १४,१५ यांना दाव्यामध्ये आपली लेखी कैफियत व ताकीद अर्जावर म्हणणे दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे योग्य होईल. कारण वादीने प्रस्तुतचा दावा हक्कप्रस्थापना व ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीस आपली कैफियत मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे प्रतिवादीची कैफीयत अभिलेखावर घेतल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ व ४ ते ११ व १४,१५ यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेतल्याने वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही या निर्णयाप्रत मी आलो आहे.

६. असे असले तरी प्रतिवादी क्र. १ व ४ ते ११ व १४,१५ यांची प्रस्तुतची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास केलेल्या विलंबामुळे न्यायालयाच्या त्याच बरोबर वादीचा बहुमूल्य वेळ वाया गेलेला आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ व ४ ते ११ व १४,१५ यांच्यावर उचित खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. १ व ४ ते ११ व १४,१५ यांचा प्रस्तुतचा अर्ज रु.४००/– इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी एकूण खर्च रक्कम रु.४००/– वादी यास अदा करावी, त्यानंतर त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करुन घेणेत येईल.

सही/–
(पी. आर. ढोरे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ

कुडाळ.
दिनांक : ११/१० /२०२३